# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३२/२०२२ मधील निशाणी क्र. १ खालील आदेश.

लता मधुकर ईरबत्तनवार विरुध्द कोणी नाही.

प्रस्तूतचा अर्ज हा अर्जदाराने बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ च्या तरतुदी अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार क्र.१ ही अर्जात नमुद पत्यावरील रहिवाशी आहे. मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार हे अर्जदार क्र. १ हिचे वडील आहेत. मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार हे मौजे पाथरी, तह. सावली, जि. चंद्रपूर येथील रहिवाशी होते व ते दिनांक १६/०१/२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयत मोंडीजी याची पत्नी नामे विमलबाई मोंडीजी वडलकोंडावार ही दिनांक २६/०४/२०१५ रोजी मयत झाली आहे. तसेच मयत मोंडीजी व विमलबाई यांना अर्जदार आणि मुलगा प्रकाश मोंडीजी वडलकोंडावार हे अपत्ये होती. प्रकाश मोंडीजी वडलकोंडावार हा दिनांक ०४/१२/१९९९ रोजी अविवाहीत मय्यत झाला आहे. त्यामुळे मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार यांचे मृत्यु पश्चात अर्जदाराला शासकीय, निमशासकीय योजनांचा लाभ घेण्याकरीता वारस दाखल्याची गरज आहे. करीता अर्जदार हिने ती मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार यांचे एकमेव वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेसाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार हिने तिचे कथनांचे पुष्ठयर्थ निशाणी ०७ वर मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार यांचे, निशाणी १५ वर मयत विमलबाई मोंडीजी वडलकोंडावार हिचे व निशाणी ०८ वर मयत प्रकाश मोंडीजी वडलकोंडावार यांचे मृत्युप्रमाणत्र दाखल केले आहेत. तसेच अर्जदार हिने निशाणी ४ चे यादी लगत सरपंच, ग्रामपंचायत, पाथरी यांनी

दिलेले मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार यांचे वारसान प्रमाणपत्र व अर्जदाराचे ओळखपत्र म्हणून तिच्या आधारकार्डची सत्यापित प्रत दाखल केली आहे. अर्जाच्या पृष्ठयार्थ अर्जदार हिने निशाणी १३ कडे तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदार हिने अर्जातील कथनांची पुर्नावृत्ती केली असुन अर्जातील मागणीस अनुसरुन वारसा प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

४. अर्जातील कथनास अनुसरुन जाहीरनामा निशाणी ७ काढण्यात आला. त्याचप्रमाणे दिनांक ०३/१२/२०२२ रोजी दैनिक पुण्या नगरी या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार अर्जदाराला तिच्या मागणी प्रमाणे ती मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार यांचे वारस असले बाबत दाखला देणेसंदर्भात हरकती मागविण्यात आल्या. परंतु, विहीत कालावधीत कोणीही न्यायालयात हजर राहून अर्जदार हिच्या मागणी प्रमाणे वारस दाखला देणेबाबत हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदाराचे मार्फत अभिलेखावर आलेला तोंडी पुरावा व त्याबाबत वरील विवेचना वरून अर्जदार ही मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. परीणामी अर्जदार ही तिच्या मागणीप्रमाणे ती मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस ती पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. अर्जदार लता मधुकर ईरबत्तनवार ही मयत मोंडीजी मार्खंडी वडलकोंडावार यांचे वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र योग्य त्या कोर्ट फी रकमेवरती जारी करण्यात यावे.

स्थळः– सावली.
दि. १०/०३/२०२३

**(अ.सं.जगताप)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सावली.